प्रेसनोट दि. २०/७/२०११

महापारेषन कंपनीच्या ट्रान्सफॉर्मर चोरीचे अट्टल गुन्हेगार स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा पुणे ग्रामीण पोलीसांकडून अटक आरोपींकडून ९०,०००/- रु. चा माल हस्तगत शेतकरी वर्गास दिलासा.

यवत पोलीस स्टेशन परिसरातील मोठ्या प्रमाणावर महापारेषन कंपनीच्या ट्रान्सफॉर्मर मधील ताब्याच्या तारा चोरी करणारे अट्टल गुन्हेगार – १) सचिन तुकाराम कांबळे रा. कदमवाकवस्ती लोणीकाळभोर ता.हवेली पुणे २) संतोष तुकाराम लोंढे ३) अनिल शिवाजी वाघाडे दोघे रा. कासुर्डी वाळवाडी ता.दौंड जि.पुणे यांचेवर निगराणी ठेवणेकामी पुणे ग्रामीण जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री.संदीप कर्णिक यांचे मार्गदर्शनाखाली स्था.गु.अन्वे.शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. नितीन गोकावे व यवत पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी श्री.शंकर अवताडे तसेच पो.हवा. संजय भोंडवे पोलीस शिपाई आनंद काळे, अमोल यादव, उमाकांत कुंजीर, सुहास खरमाटे, निलेश कदम, मयुर वाघकर, या पथकाने सदर आरोपींचे हालचालींवर लक्ष ठेवुन त्यांची गुन्हेगारी पार्श्वभुमी ओळखुन त्यांनी सन २०१० सालात डीपी चोरीचे २ गुन्हे केल्याने त्यांना यापुर्वी सदर गुन्हयात अटक झाल्याची माहीती हस्तगत करून त्यांनी यवत परीसरात केलेले आणखीण ३ गुन्हे त्यांचेकडुन उघडकीस आणुन त्यांचेकडुन महापारेषन कंपनीच्या ट्रान्सफॉर्मर मधील ताब्यांच्या तारा ३०० किलो वजनाच्या किंमत रू ९०,००० चा माल जप्त केला असुन त्यांना सदर गुन्हयाकामी अटक केले आहे.

अनेक शेतकऱ्यांची पिके विज पुरवठा खंडीत झाल्याने जळुन हवालदिल झालेल्या शेतकरी वर्गास काही प्रमाणात दिलासा मिळालेला असुन शेतकरी वर्गात आनंदाचे वातावरण निर्माण झालेले आहे. या कारवाईमुळे अश्याप्रकारचे गुन्हे करणारे टोळीचे धाबे दणाणलेले असुन स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा पुणे ग्रामिण पोलीसांनी अश्या गुन्हेगारांचे पाळेमुळेन उध्दवस्त करण्याचा मानस असुन त्यामुळे शेतकरी व ग्रामीण जनतेमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. तसेच चोऱ्यांबाबत संदर्भात जनतेमध्ये असणारे गोपनीय माहिती असल्यास सपो अधीक्षक सो श्री. संदीप कर्णिक सो. यांना S.M.S. द्वारे कळविण्याचे आवाहन केले आहे. मोबाईल नं-9922100333